दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. २४ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - २०९ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

शुक्रवार दि. २४ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, शुक्लपक्ष, अष्टमी संध्याकाळी ७-२२ पर्यंत नंतर नवमी तिथी, दिवस नक्षत्र- पुष्य रात्री ८-१४ पर्यंत.
चंद्र रास- कर्क, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

### शिवसेनेत दोन गट?

**मुंबई:** राज्यातील सर्व अमराठी रिक्षा, टॅक्सी चालकांना एक मे पासून मराठी भाषा सक्ती करण्यात येणार आहे. मराठी अनिवार्य असल्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. अमराठी रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठीचे शिकवणी वर्ग सुरु करण्यात आले आहेत. या निर्णयाला शिवसेनातूनच विरोध सुरु झाला आहे. 'प्रेमाने शिकवलेली भाषा मनात घर करते तर सक्तीने शिकवलेली भाषा भिती निर्माण करते' अशा शब्दात संजय निरुपम यांनी घरचा आहेर दिला.

## सारांश वृत्त

### शस्त्रास्त्र तस्करीचे मॉड्यूल उघडकीस

**चंदीगड :** अमृतसर पोलिसांनी गुरुवारी सांगितले की, त्यांनी तीन जणांना अटक करून आणि त्यांच्याकडून आयसीई (मेथॅम्फेटामाइन) जप्त करून सीमेपलीकडील ड्रग्ज आणि शस्त्रास्त्र तस्करी मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे. पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी सांगितले की, त्यांच्याकडून पाच अत्याधुनिक पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.

### बनावट नंबर प्लेट्सविरोधात इशारा

**हैदराबाद :** काही वाहनचालक बनावट किंवा छेडछाड केलेल्या नंबर प्लेटचा वापर करून अनेक वाहतुकीचे उल्लंघन करत असल्याचे आढळल्यानंतर हैदराबाद शहर वाहतूक पोलिसांनी जनतेला सावध केले आहे. दुचाकींच्या नोंदणी क्रमांकाचा वापर करून बनावट नोंदणी नंबर लावल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी चार जणांविरोधात स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत आणि गेल्या काही दिवसांपासून त्यांना अटक केली आहे. आरोपींनी वाहतूक उल्लंघनाचा दंड टाळण्याच्या उद्देशाने बनावट नंबर प्लेट लावली होती.

### ओडिशामध्ये पारा ४४ अंशांवर

**भुवनेश्वर :** ओडिशामध्ये गुरुवारी उष्णतेची लाट कायम राहिली असून पश्चिम विभागातील दोन ठिकाणी पारा ४४ अंश सेल्सिअसपर्यंत गेला आहे, असे आयएमडीच्या भुवनेश्वर केंद्राने सांगितले. औद्योगिक शहर झारसुगुडा आणि कोळसा शहर तालचेर येथे कमाल तापमान ४४ अंश सेल्सिअस नोंदले गेले. तब्बल २४ ठिकाणी ४० अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त तापमानाची नोंद झाली.

### पहिल्या टप्प्यात ९१.४६ टक्के; सर्वच पक्षांचा विजयाचा दावा, निकालाबाबत अनिश्चितता कायम

# बंगालमध्ये ऐतिहासिक विक्रमी मतदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानाने राज्याच्या राजकारणाला नवे वळण दिले आहे. १६ जिल्ह्यांतील १५२ जागांवर पार पडलेल्या मतदानात तब्बल ९१.४६ टक्के मतदारांनी सहभाग नोंदवला असून, ही टक्केवारी अलीकडील निवडणुकांमधील सर्वाधिक मानली जात आहे. या विक्रमी मतदानामुळे सत्ताबदलाचे संकेत आहेत की सत्ताधारी पक्षालाच याचा फायदा होणार, याबाबत राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.

दरम्यान, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात विक्रमी मतदानाची नोंद झाली असून तब्बल ९१.७८ टक्के मतदारांनी आपला हक्क बजावला आहे. हे प्रमाण स्वातंत्र्यानंतरचे सर्वाधिक असल्याची माहिती मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी दिली. पश्चिम बंगालचे मुख्य निवडणूक अधिकारी मनोजकुमार अग्रवाल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, "मतदारांनी निर्भयपणे मतदान केले. व्यवस्था समाधानकारक असल्याचे अहवाल मिळाले आहेत. घटनांची संख्या कमी झाली असून निष्पक्ष आणि शांततापूर्ण निवडणुका पार पाडण्यासाठी सर्व राजकीय पक्ष व संबंधित घटकांचे आभार." प्रशासनाच्या या भूमिकेमुळे निवडणूक प्रक्रियेबाबत विश्वास निर्माण झाल्याचे चित्र आहे.

उच्च मतदानाकडे पारंपरिकरीत्या 'बदलाची चाहूल' म्हणून पाहिले जाते. मात्र, अनेकदा याउलट चित्रही दिसून आले आहे. चुरशीच्या लढतीत सत्ताधारी पक्षाच्या बाजूनेही मोठ्या प्रमाणात मतदान होते आणि त्यामुळे मतदानाची टक्केवारी वाढते. यावेळीही असेच मिश्र चित्र असल्याने निकालाबाबत निश्चित अंदाज बांधणे कठीण झाले आहे.

दरम्यान, मतदार यादी शुद्धीकरण (एसआयआर) प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात नावे वगळली गेल्याचा मुद्दा चर्चेत आहे. लाखो मतदारांची नावे यादीतून वगळल्याच्या पार्श्वभूमीवर मतदानाच्या टक्केवारीवर त्याचा परिणाम झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रत्यक्ष मतदानाचा कल आणि राजकीय परिणाम याचे विश्लेषण अधिक गुंतागुंतीचे बनले आहे.

मागील निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात सुमारे १० टक्क्यांचे मतांतर होते, जे लोकसभा निवडणुकीत ७ टक्क्यांवर आले. भाजप हे अंतर आणखी कमी करू शकते का, हा या निवडणुकीतील कळीचा मुद्दा ठरणार आहे. भाजपला ४२-४३ टक्के मतांचा टप्पा गाठता आला, तर सत्तांतराची शक्यता निर्माण होऊ शकते; अन्यथा तृणमूलचे वर्चस्व कायम राहण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांनी आपल्या विजयाचा दावा केला आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पहिल्या टप्प्यातील मतदानावरून तृणमूल काँग्रेस आघाडीवर असल्याचा दावा केला.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही जोरदार प्रतिक्रिया देत तृणमूलच्या सत्तेचा अस्त होत असल्याचा दावा केला. "भ्रष्टाचार आणि गुंडगिरीचा सूर्य मावळत आहे," असे त्यांनी सोशल मीडियावर म्हटले.

# मविआकडून उद्धव ठाकरेंना 'ग्रीन सिग्नल'?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्रातील विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक जाहीर झाल्यानंतर सर्वच पक्षांत उमेदवारांची चाचपणी वेगाने सुरू आहे. मात्र, महाविकास आघाडीचा उमेदवार कोण असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विशेषतः उद्धव ठाकरे यांच्या रिक्त झालेल्या जागेसाठी कोणाला संधी मिळणार, हा सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील दोन्ही प्रमुख घटकांनी उद्धव ठाकरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्याचे संकेत दिले आहेत. आधी काँग्रेसकडून आणि आता शरद पवार गटाकडूनही त्यांनाच उमेदवारी देण्याचा आग्रह व्यक्त करण्यात आला आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत स्पष्ट भूमिका मांडली. "महाराष्ट्रात होणारी विधानपरिषद निवडणूक ही राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीच लढावी, अशी आमची आग्रहाची विनंती आहे. ते अनुभवी आणि ज्येष्ठ नेते असून त्यांच्या अनुभवाचा सभागृहाला फायदा होईल," असे त्यांनी म्हटले आहे. तसेच उद्धव ठाकरे यांनी या मागणीचा सकारात्मक विचार करावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. उद्धव ठाकरे यांनी स्वतः निवडणूक लढवण्याबाबत अद्याप स्पष्ट भूमिका घेतलेली नाही. मात्र, महाविकास आघाडीतील एकमत लक्षात घेता त्यांच्या नावाची शक्यता अधिक बळकट होताना दिसत आहे. विधानपरिषदेतील ही जागा महाविकास आघाडीतील राजकीय समन्वय आणि आगामी निवडणुकांसाठीची रणनीती याचाही कस लावणारी ठरणार आहे.

# सुनेत्रा पवार यांनी सहकुटुंब बजावला मतदानाचा हक्क

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामतीमध्ये पोटनिवडणूक होत आहे. या निवडणुकीत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार निवडणूक लढवत आहेत. सुनेत्रा पवार यांच्याविरोधात २१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अतिशय भावनिक वातावरणात सुनेत्रा पवार यांनी कुटुंबासह मतदानाचा अधिकार बजावला. पार्थ पवार, जय पवार, सुप्रिया सुळे, रेवती सुळे, श्रीनिवास पवार आणि शर्मिला पवार यांनी मतदान केले. अजित पवारांच्या आईंनी घरीच मतदानाचा अधिकार बजावला. यावेळी या सर्वांनी बारामतीकरांना मतदान करण्याचे आवाहन केले.

आज सकाळी काटेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. यावेळी खासदार पार्थ पवार आणि जय पवार यांनीही याच ठिकाणी मतदान करत लोकशाही प्रक्रियेत आपला सहभाग नोंदवला. याप्रसंगी सर्व नागरिकांनी जबाबदारीची जाणीव ठेवून मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. अजितदादा यांच्याबद्दलचे प्रेम, विश्वास आधार आणि त्यांनी दिलेले योगदान यासाठी बारामतीची जनता मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडत आहे. आजचे हे मतदान दादांनी बारामतीकरांसाठी इतकी वर्षे केलेल्या योगदानाची परतफेड म्हणून आहे, असे त्या म्हणाल्या.

### होर्मुझ बंद राहिल्याने तेलदर उसळले; जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा धक्का

# जगावर इतिहासातील सर्वात मोठे ऊर्जा संकट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**न्यूयॉर्क :** पश्चिम आशियातील संघर्ष तीव्र होत असताना जगासमोर अभूतपूर्व ऊर्जा संकट उभे ठाकले आहे. दररोज सुमारे १३ दशलक्ष बॅरल कच्च्या तेलाचा पुरवठा ठप्प झाल्याने जागतिक ऊर्जा सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थाचे प्रमुख फातिह बिरोल यांनी इशारा देत सांगितले की, वाढत्या इंधनदरांमुळे मागणीवर प्रचंड ताण येईल आणि त्याचा थेट फटका जागतिक अर्थव्यवस्थेला बसू शकतो.

या संकटामागे मुख्य कारण म्हणजे अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव. दोन्ही देशांनी होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा सुरू करण्यास नकार दिल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. इराणने स्पष्ट केले आहे की, अमेरिकन नौदलाची नाकेबंदी कायम असताना हा महत्त्वाचा जलमार्ग उघडला जाणार नाही. परिणामी जागतिक तेलपुरवठ्याचा मोठा भाग अडथळ्यात आला आहे.

या घडामोडींमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमतींमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. ब्रेंट क्रूडचे दर ३.६२ टक्क्यांनी वाढून प्रति बॅरल १०५.६३ डॉलर्सवर पोहोचले, तर डब्ल्यूटीआय क्रूड ४.०६ टक्क्यांनी वाढून ९६.७३ डॉलर्सपर्यंत गेले. ही वाढ जागतिक बाजारातील अस्थिरतेचे द्योतक मानली जात आहे.

पश्चिम आशियातील युद्धाचा परिणाम केवळ तेल बाजारापुरता मर्यादित नसून, त्याचा व्यापक आर्थिक परिणाम होण्याची चिन्हे दिसत आहेत. ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या देशांना आधीच जादा खर्च करावा लागत आहे.

सरकारे आणि ग्राहक यांच्यावर आर्थिक ताण वाढत असून अनेक देशांमध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतींनी उच्चांक गाठण्यास सुरुवात केली आहे.

भारतसारख्या ऊर्जा आयात करणाऱ्या देशांसाठी ही परिस्थिती अधिक चिंताजनक ठरत आहे. देशात सध्या निवडणुकीचे वातावरण असताना जागतिक स्तरावरील या संकटाचा परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर होण्याची शक्यता आहे. पेट्रोल-डिझेल दरवाढीचा परिणाम महागाईवर होऊन वाहतूक, उद्योग आणि दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

तज्ज्ञांच्या मते, होर्मुझ सामुद्रधुनी दीर्घकाळ बंद राहिल्यास परिस्थिती आणखी बिघडू शकते आणि जगाला इतिहासातील सर्वात मोठ्या ऊर्जा संकटाचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर तणाव कमी करण्यासाठी राजनैतिक प्रयत्नांची गरज अधोरेखित होत आहे.

### भारतासह काही देशांमध्ये सेवा ठप्प होण्याची भीती

# इराणच्या निशाण्यावर आता इंटरनेट केबल?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धामुळं सुरुवातीला एलपीजी पुरवठा ठप्प झाला होता. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराण सोबतची शस्त्रसंधी अनिश्चित काळासाठी सुरु ठेवली जाणार असल्याचं म्हटलंय. मात्र, अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव कमी झालेला नाही. याशिवाय अमेरिका आणि इराण यांच्यात दुसऱ्या फेरीची शांतता चर्चा कधी होणार हे देखील स्पष्ट झालेलं नाही.

अमेरिकेनं होर्मुझची सामुद्रधुनी अडवून धरली आहे. यामुळं इराणकडून देखील नवी खेळी करण्यात आली आहे. इराणच्या आयआरजीसीकडून आता होर्मुझच्या सामुद्रधुनीत असलेल्या इंटरनेट केबलला टार्गेट केलं जाऊ शकतं. इराणकडून समुद्रातील इंटरनेट केबलचं नुकसान करण्यात आल्यास भारतासह काही देशांमध्ये इंटरनेट ठप्प होऊ शकतं.

मीडिया रिपोर्टनुसार, होर्मुझची सामुद्रधुनी आणि लाल समुद्रात ऑप्टिकल फायबर केबलचं जाळं आहे. या केबलमधून बहुतांश देशांमध्ये इंटरनेट पोहोचतं. या भागातून जाणाऱ्या केबलमुळं आशिया, यूरोप आणि आफ्रिका या सारख्या देशांना इंटरनेट कनेक्टिव्हिटी मिळते. होर्मुझच्या सामुद्रधुनीत टाटा टीजीएन गल्फ, गल्फ ब्रिज इंटरनॅशनल केबल सिस्टीम्स, फाल्कन आणि एएई-१ या सारख्या मोठ्या कंपन्यांच्या केबल सिस्टीम्स आहेत. याद्वारे मोठ्या कंपन्यांच्या डेटा सेंटरला इंटरनेट कनेक्टिव्हिटी पुरवली जाते.

इराणनकडून होर्मुझची सामुद्रधुनी युद्ध थांबवण्यासाठी दबाव वाढवण्याचा भाग म्हणून बंद केली होती. आता अमेरिकेनं देखील होर्मुझच्या सामुद्रधुनीत नाकाबंदी केली आहे. या मार्गातून सागरी वाहतूक जवळपास बंद झाली आहे. इराणनं या मार्गात मॉइन्स देखील पेरले असल्याचे रिपोर्ट आले होते, त्यामुळं संकट वाढलं आहे. याशिवाय लाल समुद्रातील अल-मंडेब चामार्ग देखील सुरक्षित राहिला नव्हता.

मीडिया रिपोर्टनुसार इराणकडून अमेरिकेवर दबाव वाढवण्यासाठी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या इंटरनेट केबलला निशाणा केलं जाऊ शकतं. इंटरनेट केबलचं नुकसान झाल्यास त्याच्या दुरुस्तीला खूप वेळ लागू शकतो. सध्या होर्मुझमध्ये जहाजं जात नसून केबलचं नुकसान झाल्यास त्याच्या दुरुस्तीसाठी वेळ लागेल.

### भारत महान देश : डोनाल्ड ट्रम्प

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी भारताचा उल्लेख "नरक" केल्याच्या विधानावर स्पष्टीकरण दिले आहे. नवी दिल्लीतील अमेरिकन दूतावासाने स्पष्ट केले की, ट्रम्प भारताला एक महान देश मानतात, ज्याचे नेतृत्व त्यांच्या एका अत्यंत चांगल्या मित्राच्या हातात आहे, असे त्यांचे मत आहे. राष्ट्राध्यक्ष म्हणाले की, भारत हा एक महान देश आहे, जेथे माझा एका अत्यंत चांगल्या मित्र सर्वोच्च पदावर आहे, असे अमेरिकी दूतावासाच्या प्रवक्त्याने सांगितले. दरम्यान, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी "आम्ही काही रिपोर्ट पाहिले आहेत," असे म्हणत या प्रकरणावर भाष्य करण्यास नकार दिला होता.

# दरवर्षी होताहेत आठ लाख मृत्यू

### नोकरी जाण्याची चिंता ठरतेय जिवघेणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जीनिव्हा/नवी दिल्ली :** राहणीमान सुधारणे, कुटुंबाला आधार देणे आणि आत्मनिर्भरता जपणे यासाठी नोकरी पर्याय असते. याच पर्यायासाठी बहुतांश लोक अनेक शहरांतून कन्फर्ट सोडून दुस-या शहरांकडे वळतात. परंतु तीच नोकरी, टॉक्सिक वर्क कल्चर जेव्हा जीवघेणी ठरते तेव्हा चिंता वाढते. जीनिव्हा जागतिक कामगार संघटनेकडून समोर आलेले नवीन आकडे धक्कादायक आहेत. दरवर्षी ८ लाख ४० हजाराहून अधिक लोक टॉक्सिक वर्क कल्चरमुळे मृत्यूमुखी पडत असल्याचं रिपोर्टमध्ये सांगण्यात आले आहे.

लोकांना कामाशी निगडित चिंता, अधिक वेळ कामाला वेळ देणे, नोकरी जाण्याची चिंता सतावणे या सर्व गोष्टींमुळे साइकोसोशल रिस्क जन्माला येते. त्यामुळेच लोक हार्ट आणि ब्रेनशी निगडित समस्यांचा सामना करत आहेत. काही प्रकरणात मानसिक दबावामुळे कर्मचारी टोकाचे पाऊल उचलत आहेत. या आजारामुळे अकाली मृत्यू पावणा-या लोकांची संख्या समोर येते, ज्यामुळे दरवर्षी जागतिक जीडीपीच्या १.३७ टक्के इतके अंदाजित आर्थिक नुकसान होते. कर्मचा-यांना त्यांची उद्दिष्ट्ये साध्य करण्यास मदत व्हावी यासाठी कामाचे वातावरण कसे तयार केले जाते आणि त्याचे व्यवस्थापन कसे केले जाते हे पाहिले जाते. कार्यालयाचे वातावरण, सहकारी, वरिष्ठ आणि व्यवस्थापनासोबतचे संबंध आणि संवाद, कारण हे घटक देखील मानसिक आजारास कारणीभूत ठरतात. कार्यालयाची धोरणे आणि नियम, जसे की कामासाठी, घरून काम करण्यासाठी आणि वैयक्तिक कामासाठी वेळेवर मिळणारी रजा, आणि आरोग्याशी संबंधित लाभ यांच्याशी निगडित आहेत, असे समोर आले आहे.

### परस्पर तळांचा वापर, सैन्य तैनातीला परवानगी; पाकिस्तानसह प्रादेशिक पातळीवर खळबळ

# भारत–रशिया लष्करी करार उघड; सामरिक समीकरणात बदल

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मॉस्को :** मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारत आणि रशिया यांच्यातील महत्त्वपूर्ण लष्करी कराराची सविस्तर माहिती आता सार्वजनिक झाली आहे. गेल्या वर्षी या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या होत्या; मात्र मॉस्कोकडून त्याची व्याप्ती उघड केल्यानंतर या कराराचे सामरिक परिणाम अधिक स्पष्ट झाले आहेत. या घडामोडीमुळे पाकिस्तानसह संपूर्ण प्रदेशात चर्चांना उधाण आले आहे. या करारानुसार दोन्ही देशांना एकमेकांच्या भूभागात सैन्य, युद्धनौका आणि लष्करी विमाने तैनात करण्याची परवानगी देण्यात आली आहे. कमाल मर्यादेनुसार, ३,००० सैनिक, पाच युद्धनौका आणि दहा लष्करी विमाने परस्परांच्या तळांवर तैनात करता येणार आहेत. यामुळे गरज पडल्यास दोन्ही देशांना एकमेकांच्या लष्करी पायाभूत सुविधांचा थेट वापर करून जलद कारवाई करता येणार आहे.

संरक्षण सहकार्याच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

या कराराचे परिणाम केवळ द्विपक्षीय मर्यादित न राहता आर्क्टिकपासून हिंद महासागरापर्यंत जाणवू शकतात, असे तज्ज्ञांचे मत आहे. हिंद महासागर आणि आर्क्टिकसारख्या महत्त्वाच्या भूराजकीय क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांची उपस्थिती वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे जागतिक शक्ती-संतुलनावरही या कराराचा परिणाम होऊ शकतो.

दिल्लीस्थित सेंटर फॉर एअर पॉवर स्टडीजचे माजी महासंचालक अनिल चोप्रा यांनी या कराराचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, जानेवारी २०२६ पासून अंमलात आलेला हा करार भारत–रशिया संबंधांना अधिक बळकटी देणारा आहे.

"हा करार भारताच्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणाला पूरक असून इंडो-पॅसिफिकमध्ये शक्ती संतुलन राखण्यास मदत करतो," असे ते म्हणाले.

सामरिक दृष्टिकोनातून पाहता, या करारामुळे दोन्ही देशांना परस्परपूरक लाभ मिळणार आहेत. रशियाला हिंद महासागर क्षेत्रात प्रवेश आणि उपस्थिती वाढवण्याची संधी मिळेल, तर भारताला आर्क्टिक आणि पॅसिफिक क्षेत्रांमध्ये आपली रणनीतिक पोहोच वाढवता येणार आहे. त्यामुळे दोन्ही देशांच्या लष्करी क्षमतेला जागतिक स्तरावर नवे परिमाण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या कराराकडे पाकिस्तानसह काही देशांनी सावध नजरेने पाहण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः अमेरिका–पाकिस्तान समीकरणाच्या पार्श्वभूमीवर भारत–रशिया सहकार्य अधिक दृढ होत असल्याचा संदेश या करारातून जात असल्याचे विश्लेषकांचे मत आहे. त्यामुळे येत्या काळात या कराराचे राजनैतिक आणि सामरिक परिणाम अधिक स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# सरकारी कर्मचाऱ्यांचा संप चौथ्या दिवशीही सुरूच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** सरकारी कर्मचाऱ्यांच्या सुधारित निवृत्ती वेतन योजनेसह १८ मागण्यांवर कोणताही तोडगा न निघाल्याने उद्या सलग चौथ्या दिवशी हा संप कायम राहणार आहे. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. मात्र बैठकीचे इतिवृत्त अद्यापपर्यंत कर्मचारी संघटनांना देण्यात आलेले नाही. सुधारित पेन्शन योजनेबाबतही कोणताच ठोस निर्णय झालेला नाही. मुख्यमंत्री फडणवीसांकडूनच मागण्यांबाबत योग्य भूमिका जाहीर करण्यात यावी, अशी भूमिका कर्मचारी संघटनेकडून घेण्यात आली आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांचा संप २१ एप्रिलपासून सुरू झाला असून २२ एप्रिल रोजी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीला मुख्य सचिवांकडून चर्चेसाठी निमंत्रित करण्यात आले. यावेळी कर्मचाऱ्यांच्या १८ प्रलंबित मागण्यांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी सकारात्मक प्रतिसाद दर्शविल्यानंतरही कोणताही ठोस निर्णय सरकारकडून जाहीर करण्यात आला नाही. या बैठकीचे इतिवृत्तही संघटनांना देण्यात आले नाही. सुधारित निवृत्ती वेतन योजनेबाबतही कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. त्यामुळे मुख्यमंत्री यांच्यास्तरावर अधिकृत बैठक झाल्याशिवाय ठोस निर्णय होऊ शकणार नाही का, असा सवाल केला जात आहे.

## संपादकीय

# गणनेचा 'महानगरी' चक्रव्यूह



**शहरांच्या वाढत्या अवाढव्य आकारात माणसांची गणना हा फक्त आकड्यांचा खेळ ठरला आहे. जनगणनेची जुनाट चौकट आणि महानगरांचे बदललेले वास्तव यात मोठी दरी निर्माण झाली असून, या प्रक्रियेत रचनात्मक सुधारणा होत नाहीत, तोपर्यंत नियोजनाचा हा डोलारा आंधळेपणाच्या पायावरच उभा राहील.**

महानगरांचे नियोजन आणि तिथल्या नागरी सुविधांचा दर्जा यावर जेव्हा जेव्हा चर्चा होते, तेव्हा तेव्हा 'जनगणना' हा शब्द एखाद्या मंत्रासारखा उच्चारला जातो. पण प्रत्यक्षात, ही जनगणना ज्या पद्धतीने राबवली जाते, ती पाहता आपण एकविसाव्या शतकातील गुंतागुंतीच्या महानगरांचे मोजमाप अठराव्या शतकातल्या फुट्टपट्टीने करत आहोत की काय, अशी शंका येते. महानगरांमधील जनगणनेच्या प्रक्रियेत ज्या रचनात्मक सुधारणांची गरज आहे, ती पाहता भारतीय महानगरांच्या भविष्यातील नियोजनाची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. आपल्याकडे शहरांचे 'स्मार्ट' होण्याचे स्वप्न तर मोठ्या उत्साहाने विकले जाते, पण हे 'स्मार्ट' शहर नेमके किती लोकांसाठी आणि कोणत्या गरजांसाठी आहे, याचे मूळ आकडेच जर सदोष असतील, तर तो निव्वळ धोरणकर्त्यांचा आत्मघातकीपणा ठरतो. जनगणनेचा मूळ उद्देश हा केवळ माणसे मोजणे हा नसून, त्यांच्या जीवनमानाचा, स्थलांतराचा आणि सामाजिक स्थितीचा नकाशा तयार करणे हा असतो. मात्र, सध्याच्या महानगरी वास्तवात 'स्थलांतर' हा इतका गतिमान घटक आहे की, दर दहा वर्षांनी होणारी जनगणना ही आकडेवारी समोर येईपर्यंत कालबाह्य झालेली असते. मुंबई, पुणे, बंगळुरू किंवा दिल्ली यांसारख्या शहरांमध्ये रोज हजारो लोक येतात आणि हजारो लोक आपली राहण्याची ठिकाणे बदलतात. अशा स्थितीत, 'एका ठराविक दिवशी तुम्ही कुठे होतात?' या प्रश्नावर आधारित जनगणना ही केवळ त्या दिवसाचा एक 'स्टॅटिक फोटो' ठरते, तो शहराचा जिवंत 'व्हिडिओ' असू शकत नाही. शहरांचा विस्तार ज्या वेगाने 'पेरी-अर्बन' क्षेत्रांत होत आहे, त्या तुलनेत जनगणनेच्या 'प्रशासकीय ब्लॉक'चे नियोजन अत्यंत संथ आहे. जेव्हा जनगणना शहराच्या बदललेल्या भूगोलाशी जुळवून घेऊ शकत नाही, तेव्हा नियोजनाचा पराभव अटळ असतो. तंत्रज्ञानाचा वापर हा आपल्याकडे अजूनही केवळ डेटा एन्ट्रीपुरता मर्यादित आहे. जागतिक स्तरावर 'रिअल-टाइम' डेटा मॅपिंग आणि सॅटेलाइट इमेजरीच्या माध्यमातून लोकसंख्येच्या घनतेचे मोजमाप केले जात असताना, आपण अजूनही कागदी फॉर्म्स आणि घरोघरी जाणाऱ्या गणक कर्मचाऱ्यांच्या 'प्रामाणिकपणावर' अवलंबून आहोत. महानगरांमधील 'हाय-राईज' सोसायट्यांमध्ये किंवा झोपडपट्ट्यांच्या गलिच्छ वस्त्यांमध्ये पोहोचणे हे आजही जनगणनेच्या कर्मचाऱ्यांसाठी एक आव्हान आहे. अनेकदा, सुरक्षेच्या नावाखाली किंवा वेळेच्या अभावामुळे अनेक कुटुंबांची नोंदच होत नाही. ९१ लाख नावे वगळली जाणे किंवा स्थलांतरितांना मोजणीतून बाद करणे, हे अशाच अर्धवट प्रक्रियेचे फलित असते. कुठल्याही महानगराचे नियोजन हे 'बॉटम-अप' (खालून वर) असायला हवे. पण आपल्याकडे जनगणनेचे नियंत्रण हे केंद्राच्या गृहमंत्रालयाकडे असते आणि त्याचा वापर स्थानिक महापालिकांना करायचा असतो. या दोन यंत्रणांमधील संवादाचा अभाव हा रचनात्मक सुधारणांच्या मार्गातील मोठा अडथळा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना जर त्यांच्या प्रभागातील नेमकी लोकसंख्या, त्यांचे वयोगट आणि त्यांची क्रयशक्ती माहिती नसेल, तर त्यांनी पिण्याच्या पाण्याचे किंवा सांडपाण्याचे नियोजन कसे करावे? जेव्हा 'डेटा' हाच चुकीचा असतो, तेव्हा 'डिलिव्हरी' ही नेहमीच अपुरी पडते. शहरांच्या या चक्रव्यूहात अडकलेल्या जनगणनेला आता केवळ 'मोजणी'च्या पलीकडे जावे लागेल. आपल्याला आता अशा यंत्रणेची गरज आहे जी शहरात येणाऱ्या प्रत्येक स्थलांतरिताची नोंद घेईल आणि त्याच्या नागरी हक्कांचे जतन करेल. केवळ 'फ्लोटिंग पॉप्युलेशन' (तरती लोकसंख्या) कडे दुर्लक्ष करून महानगरांचे नियोजन करणे म्हणजे रेल्वे प्लॅटफॉर्मवर गर्दी असताना केवळ आरक्षित तिकिटांच्या आधारे डबे जोडण्यासारखे आहे. जनगणना ही केवळ लोकशाहीची एक औपचारिकता नसून ती भविष्यातील संकटांची पूर्वसूचना देणारी यंत्रणा असायला हवी. आपण महानगरांच्या जनगणनेत तातडीने रचनात्मक बदल केले नाहीत, तर आपल्या शहरांमधील गर्दी ही केवळ एक 'संख्या' उरेल आणि तिथली गुणवत्ता ही केवळ कागदावरचे स्वप्न. आकड्यांच्या या मृगजळामागे धावण्यापेक्षा, वास्तवाचे भान ठेवून प्रक्रियेत पारदर्शकता आणि आधुनिकता आणणे, हेच आता शासनकर्त्यांसमोरचे खरे आव्हान आहे. अन्यथा, शहरांचा हा डोलारा लोकसंख्येच्या ओझ्याखाली कधी कोलमडून पडेल, हे समजायलाही आपल्याकडे नेमकी आकडेवारी नसेल.

# युरोपीय व्यापार आणि नियमांचा चक्रव्यूह

जागतिक अर्थकारणाच्या पटावर सध्या 'मुक्त व्यापार करार' नावाचा एक नवा खेळ मांडला जात आहे. भारताने गेल्या काही वर्षांत ऑस्ट्रेलिया आणि यूएई सोबत अशा प्रकारचे करार करून आपली व्यापार-क्षमता सिद्ध करण्याचा प्रयत्न केला असला, तरी खरा 'अंतिम सामना' हा युरोपीय महासंघासोबत होणाऱ्या कराराचा आहे. हा करार म्हणजे केवळ दोन बाजूंमधील आयात-निर्यात शुल्काची कपात नाही, तर ती भारताच्या 'कम्प्लायन्स' (नियम पालनाची) आणि जागतिक मानकांशी जुळवून घेण्याच्या क्षमतेची चाचणी आहे.




युरोपशी व्यापार करणे म्हणजे निव्वळ वस्तूंची देवाणघेवाण नव्हे, तर त्यांच्या जागतिक 'नियमपुस्तका'चे पालन करण्याची अट मान्य करणे होय.

युरोपीय महासंघाचे वैशिष्ट्य असे की, ते व्यापाराकडे केवळ 'नफा-तोटा' या दृष्टिकोनातून पाहत नाहीत, तर त्यात पर्यावरण, मानवाधिकार आणि कामगार कायदे अशा सामाजिक अटींचा समावेश करतात. भारतासाठी हीच सर्वात मोठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे. युरोपचा 'कार्बन बॉर्डर ॲडजस्टमेंट मेकॅनिझम' हा अशाच एका अटीचा भाग आहे. म्हणजेच, जर भारतीय पोलाद किंवा सिमेंटचे उत्पादन करताना कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण जास्त असेल, तर त्यावर अतिरिक्त कर लावला जाईल. भारताने याला 'व्यापारी अडथळा' म्हणून हिणवले असले तरी, युरोप आपल्या पर्यावरणाच्या मुद्द्यावर तसूभरही मागे हटायला तयार नाही. अशा वेळी, आपण आपल्या उत्पादन प्रक्रियेत बदल करणार की युरोपच्या अटींना पर्यायी मार्ग शोधणार, हा कळीचा प्रश्न आहे.

बौद्धिक संपदा अधिकारांचा मुद्दा हा या करारातील आणखी एक 'मेख' आहे. भारताची औषध निर्मितीची क्षमता जगाला ठाऊक आहे आणि आपण 'जगाची फार्मसी' म्हणून मिरवतो. परंतु, युरोपीय कंपन्यांना त्यांच्या औषधांच्या पेटंटसाठी अधिक कडक संरक्षण हवे आहे. भारताने त्यांच्या अटी मान्य केल्या, तर आपल्या 'जेनेरिक' औषध उद्योगाला मोठा फटका बसू शकतो. गरिबांना स्वस्त औषधे उपलब्ध करून देण्याचे भारताचे धोरण आणि युरोपीय नफाखोरी यांच्यात हा एक सनातन संघर्ष आहे. मुक्त व्यापाराच्या नादात आपण आपल्या जनहितकारी धोरणांचा बळी देणार का, याचे उत्तर दिल्लीच्या मंत्रालयांना द्यावे लागेल.

युरोपीय महासंघ हा केवळ एक बाजारपेठ नाही, तर तो नियमांचा एक जटिल 'कोळीवाडा' आहे. भारताला जर तिथे स्थान मिळवायचे असेल, तर आपल्या देशातील कामगार कायदे आणि डिजिटल डेटा संरक्षणाचे कायदे हे जागतिक दर्जाचे करावे लागतील. आपण सध्या ज्या प्रकारे 'डेटा प्रायव्हसी'च्या बाबतीत चाचपडत आहोत, ते पाहता युरोपचे 'जीडीपीआर' सारखे कडक निकष आपल्याला पेलतील का, यावर शंका घेण्यास वाव आहे. जेव्हा व्यापार हा नियमांवर आधारित असतो, तेव्हा 'जुगाड' किंवा 'ॲडजस्टमेंट'ला तिथे थारा नसतो. अर्थात, या कराराचे फायदेही मोठे आहेत. युरोप हा

> » **युरोपीय महासंघाशी मुक्त व्यापार कराराचे स्वप्न पाहताना भारताला आता निव्वळ बाजारपेठेच्या विस्ताराचा विचार करून चालणार नाही. जागतिक मानके आणि नियमांच्या पालनाची ही एक कठोर 'अग्निपरीक्षा'च आहे.**

भारताचा तिसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. जर हा करार यशस्वी झाला, तर भारतीय वस्त्रोद्योग, चर्मोद्योग आणि कृषी उत्पादनांना युरोपची मोठी बाजारपेठ विनाशुल्क उपलब्ध होईल. पण हे फायदे पदरात पाडून घेण्यासाठी आपल्याला जी 'किंमत' मोजावी लागणार आहे, ती केवळ आर्थिक नाही तर धोरणात्मक आहे. मुक्त व्यापाराचा अर्थ असा नाही की आपण आपले दार सताड उघडे ठेवावे; तर त्याचा अर्थ असा आहे की आपण आपल्या घरातले नियम जगाच्या नियमांशी सुसंगत करावेत.

येथे एक गोष्ट स्पष्ट आहे की, भारत आता 'संरक्षणवादी' भूमिकेतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत आहे. पण ही प्रक्रिया 'फास्ट ट्रॅक'वर नेताना आपण आपली मूळ आर्थिक स्वायत्तता गहाण ठेवणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल. युरोपीय महासंघाशी होणारा हा करार म्हणजे एका बाजूला संधींचे आकाश आहे, तर दुसऱ्या बाजूला अटींची काटेरी कुंपणे. व्यापार हा कधीही एकतर्फी नसतो. युरोपला जर भारताची अफाट लोकसंख्या आणि वाढती बाजारपेठ हवी असेल, तर त्यांनाही भारताच्या विकासात्मक मर्यादा समजून घ्याव्या लागतील. पण तोपर्यंत, भारताला आपल्या 'कम्प्लायन्स'ची पातळी वाढवण्यासाठी कंबर कसावी लागेल. जर आपण जागतिक मानकांच्या या परीक्षेत नापास झालो, तर मुक्त व्यापाराचे हे स्वप्न केवळ कागदावरच राहील. युरोपीय वाघाशी मैत्री करताना त्याच्या नखांची धार ओळखणे, हेच मुत्सद्देगिरीचे लक्षण ठरेल.

# अनधिकृत बांधकामांवर महापालिकेची धडक कारवाई

## इतर नियमबाह्य बांधकामांवरही निष्कासन कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडून शहरातील विविध भागांमध्ये अनधिकृत बांधकामांविरोधात व्यापक कारवाई करण्यात येत आहे. या मोहिमेत ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत पिंपळे गुरव येथे ५३० चौ.मी. तर ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत नवी सांगवी परिसरात १ हजार ५४५ चौ.मी. क्षेत्रफळावरील आरसीसी अनधिकृत बांधकामे पाडण्यात आली. याशिवाय इतर नियमबाह्य बांधकामांवरही निष्कासन कारवाई करण्यात आली.

मागील आठवड्यात आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी क्षेत्रीय कार्यालयनिहाय सुरू असलेल्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकामांविरोधातील कारवाईचा आढावा घेतला होता. त्यानंतर कारवाई अधिक सक्त करण्याचे निर्देश देण्यात आले. अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम अधिक वेगाने राबविण्यात येत आहे.

ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत क्षेत्रीय अधिकारी पूजा दुधनाळे यांच्या नेतृत्वात वार्ड क्र. २९ मधील पिंपळे गुरव परिसरातील गणेशनगर, साईनाथनगर आणि लक्ष्मीनगर येथे ५३० चौ.मी. आरसीसी बांधकामांवर कारवाई करण्यात आली. या वेळी उपअभियंता शाम गर्जे, बीट निरीक्षक विक्रम चव्हाण, राहुल निकम, उमेश लोंढे, ओंकार देशमुख, पूजा राठोड तसेच एमएसएफ जवान, मजूर, पोलीस कर्मचारी आणि यंत्रसामग्रीचा वापर करण्यात आला.

ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत वार्ड क्र. ३१ मधील नेताजी नगर, गांगर्डे नगर, विनायक नगर आणि गजानन नगर परिसरात १ हजार ५४५ चौ.मी. क्षेत्रावरील आरसीसी बांधकामांवर निष्कासन कारवाई करण्यात आली. या मोहिमेत उपअभियंता प्रताप मोरे, कनिष्ठ अभियंता जयवंत रोकडे, बीट निरीक्षक शाबोद्दिन बागबान, रोहन कांबळे, प्रफुल्ल भोकरे, सुरज माने यांच्यासह एमएसएफ जवान, मजूर आणि यंत्रसामग्री सहभागी होती.

महापालिकेच्या तपासणीत विविध ठिकाणी विनापरवानगी आरसीसी बांधकामे, शेड तसेच इतर प्रकारची अनधिकृत वाढ आढळून आली. त्यानुसार संबंधितांवर कारवाई करत मोठ्या प्रमाणात बांधकामे हटविण्यात आली. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले असून, या मोहिमेचा नियमित आढावा घेण्यास सांगितले आहे. रस्त्यावर स्टॉल लावणाऱ्या फेरीवाल्यांवरही कारवाई करण्यावर भर देण्यात आला आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी ही मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असून, नागरिकांनीही नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# माता रमाई स्मारकास मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीने पिंपरी चौकात उभारण्यात येणाऱ्या त्यागमूर्ती माता रमाई स्मारकाच्या स्थापत्य कामांना मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे नागरिकांची दीर्घकालीन मागणी पूर्ण होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले असून, स्मारकाच्या उभारणीस लवकरच सुरुवात होणार आहे.

महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधूकर पवळे सभागृहात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. सभेला स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे तसेच नगरसचिव मुकेश कोळप आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

माता रमाई या त्याग, संघर्ष आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक मानल्या जातात. वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी दिलेले योगदान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला दिलेली साथ प्रेरणादायी असल्याचे मानले जाते. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी उभारले जाणारे हे स्मारक भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निर्णयामुळे स्मारकाच्या कामाला गती मिळणार असून, शहराच्या सौंदर्यात भर पडण्यासोबतच सामाजिक वारसा जपण्याच्या दृष्टीनेही हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.

# स्थायी समिती बैठकीत विविध प्रस्तावांना मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधूकर पवळे सभागृहात पार पडली. या बैठकीत शहराच्या आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि स्वच्छतेशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. बैठकीस आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



बैठकीत आरोग्य सेवा आणि रुग्णालयांतील सुरक्षाविषयक कामांना प्राधान्य देत आकुर्डी हॉस्पिटल, ग. दि. माडगूळकर नाट्यगृह तसेच इतर प्रशासकीय इमारतींमध्ये फायर सेफ्टी ऑडिटनुसार आवश्यक दुरुस्ती आणि देखभाल कामांना मंजुरी देण्यात आली. जिजामाता, पिंपरी, आकुर्डी आणि मासुळकर रुग्णालयांमधील विविध तांत्रिक आणि देखभाल कामांनाही हिरवा कंदील देण्यात आला.

शिक्षण क्षेत्रात मनपा शाळांतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देणे, शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी उपाययोजना राबवणे तसेच काही शाळांमध्ये स्मार्ट किड्स फिटनेस उपकरणे उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. आकुर्डी येथील माध्यमिक विद्यालयातील एमएससीआयटी केंद्राचे नूतनीकरण करण्यासही मंजुरी देण्यात आली.

शहर स्वच्छता आणि पर्यावरणाच्या दृष्टीने कचरा संकलन व अलगीकरणाबाबत जनजागृती मोहीम राबवण्यासाठी संस्थांची नेमणूक, स्वच्छ भारत अभियान आणि माझी वसुंधरा अभियानांतर्गत प्रकल्पांसाठी एजन्सी नियुक्ती, तसेच मैला शुद्धीकरण प्रकल्पांशी संबंधित विविध कामांना मंजुरी देण्यात आली. पायाभूत सुविधांच्या दृष्टीने विविध प्रभागांमध्ये रस्ते विकास, फुटपाथ बांधकाम, नालेसफाई, जलनिस्सारण व्यवस्था सुधारणा आणि बोअरवेल दुरुस्ती यांसारख्या कामांना मान्यता देण्यात आली. रावेत येथील संत तुकाराम महाराज पुलावर सुशोभीकरणासाठी डेकोरेटिव्ह पोल बसविणे तसेच शहरातील विविध भागांमध्ये विद्युत व स्थापत्य विषयक कामे करण्यासही मंजुरी देण्यात आली.

# हडपसरमध्ये विद्यार्थ्यावर फरशीने हल्ला; तिघांविरुद्ध गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**हडपसर** : मगरपट्टा परिसरातील तुपे कॉर्नर येथे २० वर्षीय विद्यार्थ्यावर तिघा अज्ञात तरुणांनी फरशीच्या तुकड्याने हल्ला करत बेदम मारहाण केल्याची घटना मंगळवारी मध्यरात्री घडली. या हल्ल्यात विद्यार्थी गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सिद्धार्थ वसंत वाघमारे (वय २०, रा. शिंदेवस्ती, मगरपट्टा वेस्ट गेट, हडपसर) असे जखमी विद्यार्थ्याचे नाव आहे. या प्रकरणी तिघा अज्ञात तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिद्धार्थने




बारावीची परीक्षा दिली असून तो मित्र अवधूत सकट याला भेटण्यासाठी गेला होता. रात्री उशिरा अवधूत सकट आणि युवराज कांबळे हे दोघे त्याला घरी सोडण्यासाठी निघाले असताना महादेव मंदिराजवळ ॲमनोराच्या मागील बाजूस काही ओळखीच्या व्यक्तींनी त्यांना थांबवले. “मित्राची किरकिरी झाली आहे” असे सांगत त्यांना तुपे कॉर्नर येथील एका दुकानाजवळ नेण्यात आले. तेथे सिद्धार्थ बाहेर थांबलेला असताना अचानक तोंडावर मास्क घातलेले तीन अज्ञात तरुण आले आणि कोणतीही पूर्वसूचना न देता त्याच्यावर हल्ला केला. हल्लेखोरांपैकी एकाने फरशीच्या तुकड्याने त्याच्या डोक्यावर प्रहार केला. त्यामुळे तो खाली कोसळला. त्यानंतर आरोपींनी त्याच्या छातीवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

या हल्ल्यात सिद्धार्थच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून काही वेळ तो अर्धबेशुद्ध अवस्थेत होता. मित्रांनी तात्काळ त्याला माळवाडी येथील रुग्णालयात दाखल केले. सध्या त्याच्यावर उपचार सुरू असून तो शुद्धीवर आला आहे.

या प्रकरणी सिद्धार्थ वाघमारे यांच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम ११८(१) आणि ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून हल्लेखोरांचा शोध सुरू असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू आहे.

### दापोडीत दोन तरुणांकडून देशी पिस्तुले जप्त

**दापोडी** : गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सतर्क असलेल्या दापोडी पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने धाडसी कारवाई करत दोन संशयित तरुणांना ताब्यात घेत त्यांच्या ताब्यातून दोन देशी बनावटीची पिस्तुले, सहा जिवंत काडतुसे आणि दोन मॅगझिन जप्त केली.

या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून संभाव्य गंभीर गुन्हा टळल्याचे सांगितले जात आहे.

यश नंदकिशोर कांबळे (वय १९, रा. पिंपळे गुरव) आणि अथर्व सुनील भोकरे (वय २१, रा. नवी सांगवी) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तपास पथकातील अधिकारी नियमित गस्त घालत असताना पोलीस हवालदार प्रवीण पाटील यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, दोन तरुण पिस्तुलांसह कासारवाडी परिसरात भोसरी–सांगवी उड्डाणपुलाखाली संशयास्पदरीत्या थांबले असून ते गुन्हा करण्याच्या तयारीत आहेत.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ सापळा रचून घटनास्थळी धाड टाकली.

कारवाईदरम्यान दोन्ही संशयितांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या झडतीत दोन देशी पिस्तुले, सहा जिवंत काडतुसे आणि दोन मॅगझिन जप्त करण्यात आले.

या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) तसेच भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक माहितीनुसार आरोपींचा पूर्वी गुन्हेगारी इतिहास नसल्याचे समोर आले आहे.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक भास्कर, पोलीस हवालदार पाटील तसेच अंमलदार काळे, ओहोळ, सोनावणे आणि संकुनहट्टे यांच्या पथकाने केली.

# जिजामाता रुग्णालयातील सेवांची उपमहापौरांकडून पाहणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील जिजामाता रुग्णालयाला उपमहापौर शर्मिला बाबर यांनी भेट देत आरोग्य सेवांची प्रत्यक्ष पाहणी केली. रुग्णालयातील स्वच्छता व्यवस्था, औषधसाठा, डॉक्टर व परिचारिका यांची उपलब्धता तसेच उपचार प्रक्रियेची कार्यक्षमता यांचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला.

भेटीदरम्यान त्यांनी रुग्णांशी संवाद साधून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली आणि उपचारांबाबतचे अनुभव जाणून घेतले. नागरिकांना उपचारासाठी कोणतीही अडचण भासू नये, यासाठी आवश्यक सुविधा तत्काळ उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या. रुग्णालयातील सेवा अधिक सक्षम, गतिमान आणि नागरिकाभिमुख करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

यावेळी शर्मिला बाबर म्हणाल्या की, महापालिकेमार्फत नागरिकांना दर्जेदार आणि परवडणाऱ्या आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला वेळेत आणि योग्य उपचार मिळावेत, यासाठी अधिक दक्षता घेणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. स्वच्छता, औषधांची उपलब्धता आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांची तत्परता याकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### रांजणगाव औद्योगिक वसाहतीत तणाव

**रांजणगाव गणपती :** रांजणगाव औद्योगिक वसाहतीतील बेकर्ट कंपनीमध्ये कामगार युनियन स्थापन करण्याच्या मुद्द्यावरून मनसे आणि भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये तीव्र मतभेद निर्माण झाले. या वादामुळे काही काळ परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, कंपनीतील कामगारांसाठी स्वतंत्र युनियन स्थापन करण्याच्या प्रयत्नांवरून दोन्ही गटांमध्ये वाद वाढला. यावेळी दोन्ही बाजूंनी घोषणाबाजी करण्यात आली. परिस्थिती चिघळण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत हस्तक्षेप केला. तणाव वाढू नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी भाजपच्या काही स्थानिक पदाधिकाऱ्यांना ताब्यात घेतल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेमुळे औद्योगिक वसाहतीत काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

### किरकोळ कारणावरून भीषण हाणामारी

**सासवड :** मोटारसायकल स्लिप झाल्याच्या किरकोळ कारणावरून दोन गटांमध्ये भीषण हाणामारी झाल्याची घटना सासवड (ता. पुरंदर) येथील खंडोबानगर परिसरात सोमवारी सायंकाळी घडली. या घटनेत दोन्ही गटांतील काही तरुण जखमी झाले असून सासवड पोलिसांनी आठ जणांवर परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, वादाची सुरुवात किरकोळ कारणावरून झाली; मात्र तो अल्पावधीतच तीव्र झाला. या हाणामारीत कोयता, लोखंडी गज, बॅट तसेच दगडांचा वापर करण्यात आला. दोन्ही गटांतील तरुणांनी एकमेकांवर प्राणघातक हल्ल्याचा प्रयत्न केल्याचे आरोपही करण्यात आले आहेत. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. सासवड पोलिसांनी दोन्ही बाजूंच्या तक्रारींवरून प्राणघातक हल्ल्याचे गुन्हे नोंदवले आहेत.

## २०२६-२०२७ च्या गळीत हंगामाची तयारी

# श्री छत्रपतीत ऊस तोड-वाहतूक कराराचा शुभारंभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भवानीनगर :** भवानीनगर (ता. इंदापूर) येथील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या २०२६-२०२७ च्या गळीत हंगामाकरिता १९ एप्रिलपासून अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर ऊस तोडणी-वाहतूक कराराचा शुभारंभ करण्यात आला.

श्री छत्रपती कारखान्याच्या येत्या गाळप हंगामाकरिता कारखान्याच्या कार्यक्षेत्रात आतापर्यंत २०,१७० एकर उसाची नोंद झाली आहे. कार्यक्षेत्रातील संपूर्ण उसाचे वेळेत गाळप होण्यासाठी आवश्यक असलेली ऊस तोडणी-वाहतूक यंत्रणा उभारण्यात येणार आहे. मागील हंगामात ७ लाख ५६ हजार २८५ टन उसाचे गाळप झाले होते. या हंगामात कारखान्याला सरासरी ११.३६ टक्के साखर उतारा मिळाला होता. हा उतारा मागील दहा हंगामांच्या तुलनेत उच्चांकी ठरला आहे. या हंगामात दररोज ८ हजार टनांपेक्षा जास्त ऊस गाळप करण्यात आला. प्लांटमध्ये कुठेही जॅमिंग न होता कमीत कमी थांबे (स्टॉपेजेस) झाले. मागील हंगाम यशस्वी करण्यासाठी ऊस उत्पादक सभासद, बिगर सभासद, ऊस तोडणी-वाहतूक कंत्राटदार, मजूर तसेच कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. येत्या गळीत हंगामातही असेच सहकार्य अपेक्षित असल्याचे कारखाना प्रशासनाने सांगितले.

कारखान्याच्या येत्या गाळप हंगामाकरिता कार्यक्षेत्राबाहेरील उसाच्या नोंदीही घेण्यात येत आहेत. त्यामुळे ऊस वाहतूक कंत्राटदार आणि कार्यक्षेत्राबाहेरील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कारखान्याशी संपर्क साधून वेळेत करार करावेत, असे आवाहन कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक आणि उपाध्यक्ष कैलास गावडे यांनी केले.

यावेळी संचालक सतीश देवकाते, प्रशांत दराडे, निलेश टिळेकर, कार्यकारी संचालक अशोक जाधव, जनरल मॅनेजर हनुमंत करवर, मुख्य शेतकी अधिकारी जालिंदर शिंदे, कामगार नेते युवराज रणवरे, ऊस तोडणी-वाहतूक संघटनेचे अध्यक्ष विजय पाटील तसेच कंत्राटदार अनिल निकम, दत्तात्रय चोरमले, गणेश भगत, शहाजी भगत, आक्काबाई भगत, हरिभाऊ गांधले, अजित सपकाळ, सतीश आटोळे, महादेव तनपुरे, बाळासाहेब थोरात, संजय भोईटे, संजय पवार, गजानन पवार, चंद्रकांत चव्हाण, अमर गरदडे, हनुमंत दणाणे, माऊली मेटकरी, राजेंद्र डोंबाळे, किरण अर्जुन, काशिनाथ देवकाते, दिलीप चौधरी, संतोष खाडे, भाऊ पडळकर आदी उपस्थित होते.

## व्यक्तिमत्त्व विकासासाठी वाचन महत्त्वाचे : ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** विद्यार्थ्यांमध्ये मोबाईल आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे वाचनाची सवय कमी होत असून, व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्यासाठी वाचन अत्यावश्यक असल्याचे मत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने आयोजित वाचकवीर पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. योगेश वाळुंज, डॉ. गणेश धुमाळ, प्रा. अपर्णा कुलकर्णी तसेच प्रबंधक नारायण शिंदे उपस्थित होते.

या कार्यक्रमात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा वाचकवीर पुरस्कार एम.ए.च्या विद्यार्थिनी सीमा शेलार यांना प्रदान करण्यात आला. पुरस्कारामध्ये चार हजार रुपयांच्या पुस्तकांसह सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्राचा समावेश होता. या पुरस्काराचे हे तिसरे वर्ष आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

# शिवांजलीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात साजरा



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपळवंडी :** चाळकवाडी येथील शिवांजली विद्यानिकेतन विद्यालयाच्या २०००-२००१ च्या एसएससी बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. तब्बल २५ वर्षांनंतर एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी जुन्या शालेय आठवणींना उजाळा देत मैत्रीचे बंध अधिक दृढ केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व माजी विद्यार्थी विद्यालयात एकत्र येत शिक्षकांशी संवाद साधला. त्यानंतर स्नेहभोजन आणि मुक्त गप्पांच्या माध्यमातून जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. प्रत्येकाने आपल्या शालेय जीवनातील अनुभव कथन करत सध्या करत असलेल्या व्यवसाय व नोकरीची माहिती एकमेकांना दिली.

या कार्यक्रमाला संस्थेचे संस्थापक अध्यक्ष इंजि. शिवाजी चाळक, मुख्याध्यापक भानुदास चासकर तसेच शिक्षक व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. यावेळी नवनिर्वाचित नगरसेविका अंजली वाळुंज यांचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत शाळेसाठी लाकडी कपाट व सागवानाची खुर्ची भेट दिली. तसेच सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. दीर्घ काळानंतर झालेल्या या भेटीत जुन्या मैत्रीचे नाते अधिक दृढ झाल्याचे समाधान उपस्थितांनी व्यक्त केले. हा स्नेहमेळावा सर्वांसाठी संस्मरणीय ठरला.

या स्नेहमेळाव्यास राहुल सोनवणे, मधुकर सोनवणे, ओंकार सोनवणे, निलेश काचळे, अंकुश काकडे, विशाल फापाळे, निलेश पायमोडे, सुप्रिया वाघ आदी माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# कांदा उत्पादक शेतकऱ्यांची धांदल

## अवकाळी पावसाच्या शक्यतेने मोठे आव्हान



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात बुधवारी दुपारनंतर हवामानात अचानक बदल झाल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांची धांदल उडाली आहे. दिवसभर कडक ऊन असताना अचानक ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने अवकाळी पावसाची शक्यता वाढली असून, शेतात काढून ठेवलेला कांदा सुरक्षित ठेवण्याचे मोठे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे राहिले आहे.

तालुक्यात सध्या कांदा काढणी अंतिम टप्प्यात असून अनेक शेतकऱ्यांचा कांदा अजूनही उघड्यावर आहे. काही ठिकाणी कांदा बराकीत साठवण्याचे काम सुरू असले तरी हवामानातील बदलामुळे या कामाला वेग आला आहे. पावसाचा धोका लक्षात घेऊन शेतकरी शक्य तितक्या लवकर कांदा सुरक्षित ठिकाणी हलवण्याचा प्रयत्न करत आहेत. एकाच वेळी साठवणुकीची लगबग वाढल्याने मजुरांची टंचाई निर्माण झाली आहे. परिणामी, उपलब्ध मजुरांना जास्त मजुरी देऊन काम करून घ्यावे लागत असल्याने उत्पादन खर्चात वाढ होत आहे.

नागापूर येथील शेतकरी सोमनाथ मिंडे यांनी सांगितले की, कांदा काढणीपासून साठवणुकीपर्यंत खर्च मोठ्या प्रमाणात वाढला असून त्यांच्या शेतातील कांद्यावर आतापर्यंत सुमारे एक लाख वीस हजार रुपयांचा खर्च झाला आहे. सध्याचे बाजारभाव समाधानकारक नसल्याने कांदा साठवण्याशिवाय पर्याय नसल्याचे त्यांनी नमूद केले.

गेल्या दोन दिवसांपासून हवामानात सातत्याने बदल होत असल्याने अवकाळी पावसाची भीती कायम आहे. वेळेत कांदा सुरक्षित साठवता न आल्यास मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# तंबूमुळे मेंढपाळांना मोठा दिलासा



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर जुन्नर वन विभागाने राबविलेल्या तंबू आणि सौर दिवे वितरण उपक्रमामुळे धनगर समाजातील मेंढपाळांना मोठा दिलासा मिळाला आहे. सहा महिन्यांपूर्वी देण्यात आलेल्या या सुविधांचा मेंढपाळांकडून सध्या प्रभावी वापर होताना दिसत आहे.

भटकंतीदरम्यान विशेषतः रात्रीच्या वेळी सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनत होता. बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे मेंढपाळ आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. ही परिस्थिती लक्षात घेऊन वन विभागाने तातडीने उपाययोजना करत तंबू आणि सौर दिव्यांचे वाटप केले.

सध्या या तंबूंमुळे मेंढपाळांना सुरक्षित निवारा उपलब्ध झाला आहे. चांडोली येथील मेंढपाळ सुखदेव लक्ष्मण टकले यांनी सांगितले की, तंबूमुळे रात्रीच्या वेळी कुटुंबासह सुरक्षितपणे राहता येत असून बिबट्यांच्या हल्ल्यांपासून संरक्षण मिळत आहे. सौर दिव्यांमुळे अंधारात प्रकाशाची सुविधा उपलब्ध झाल्याने हालचाली अधिक सुरक्षित झाल्या आहेत.

या उपक्रमामुळे मेंढपाळांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल झाल्याचे दिसून येत आहे.

जुन्नर वन विभागाच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, अशाच प्रकारचे उपक्रम पुढील काळातही राबविण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

# विजयाताई शिंदे बेस्ट वूमन लीडर ऑफ द इयर




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** राजगुरुनगर सहकारी बँकेच्या माजी अध्यक्षा व विद्यमान संचालिका विजयाताई शिंदे यांना नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रातील 'बेस्ट वूमन लीडर ऑफ द इयर २०२६' या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, इन्फोमीडिया आणि नॅफकब यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथे आयोजित राष्ट्रीय नागरी सहकारी बँकिंग शिखर परिषदेत बुधवारी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सहकार क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे आणि कार्यतत्परतेमुळे संस्थेच्या प्रगतीला नवे बळ मिळाल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी नमूद केले. पुरस्कार स्वीकारल्यानंतर विजयाताई शिंदे यांनी हा सन्मान कुटुंबीय, सहकारी आणि शुभेच्छुकांच्या पाठबळामुळे शक्य झाल्याचे सांगितले. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# धोकादायक विजेच्या खांबांची दुरुस्त



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील पारगाव ते लाखनगाव मार्गावरील चिचगाई परिसरातील धोकादायक अवस्थेतील विजेचे खांब अखेर दुरुस्त करण्यात आले आहेत. या समस्येबाबत वृत्त प्रसिद्ध होताच महावितरण प्रशासनाने तात्काळ दखल घेत कारवाई केली.

या मार्गालगत उभे असलेले चार ते पाच विजेचे खांब एका बाजूला झुकल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला होता. या रस्त्यावरून नागरिक, वाहनचालक तसेच शाळकरी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात ये-जा करत असल्याने परिसरात भीतीचे वातावरण होते.

या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांनी महावितरण कंपनीकडे निवेदन देऊन तातडीने दुरुस्तीची मागणी केली होती. त्यानंतर या विषयावर वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर प्रशासनाने तत्परता दाखवत संबंधित खांबांची दुरुस्ती केली आणि संभाव्य धोका टाळला.

वेळेत कारवाई करून समस्या मार्गी लावल्याबद्दल नागरिकांनी महावितरण प्रशासनाचे तसेच विषयाला वाचा फोडणाऱ्या माध्यमांचे आभार व्यक्त केले.

## शेतकऱ्यांसमोर कामे वेळेत पूर्ण करण्याचे आव्हान

# मजूर टंचाईमुळे शेतीसमोर मोठे संकट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** वाढते उत्पादन खर्च, मजूर टंचाई आणि अनिश्चित हवामान यामुळे शेतकऱ्यांसमोर गंभीर आव्हाने उभी राहिली आहेत. रोज ५०० रुपये मजुरी देऊनही शेतमजूर उपलब्ध होत नसल्याने शेतीची कामे वेळेत पूर्ण करणे कठीण झाले आहे.

कृषिप्रधान देशात मोठा वर्ग शेतीवर अवलंबून असला तरी शेती मोठ्या प्रमाणात पावसावर अवलंबून आहे. पावसाचा उशीर, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी किंवा दुष्काळ यामुळे पिकांचे नुकसान होत असून, मागील काही वर्षांत या संकटांची तीव्रता वाढली आहे. त्यामुळे उत्पन्नात अनिश्चितता निर्माण झाली आहे.

शेतीमाल उत्पादनासाठी लागणाऱ्या खर्चातही मोठी वाढ झाली आहे. बियाणे, खते, कीटकनाशके आणि इंधनाच्या दरवाढीमुळे पेरणीपासून काढणीपर्यंतचा खर्च लक्षणीयरीत्या वाढला आहे. सध्या एक एकर शेतीसाठी सुमारे ४ ते ५ हजार रुपयांचा खर्च येत असून त्यामानाने उत्पन्न वाढत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडत आहेत.

मजुरांची टंचाई ही आणखी एक गंभीर समस्या ठरत आहे. मजुरीचे दर वाढले असले तरी वेळेवर मजूर मिळत नसल्याने शेतीची कामे रखडत आहेत. काही प्रमाणात यांत्रिकीकरणाचा वापर वाढला असला तरी इंधनदर वाढल्याने ट्रॅक्टरच्या भाड्यातही वाढ झाली आहे. मागील दोन वर्षांत ट्रॅक्टरच्या तासिक दरात सुमारे १०० रुपयांनी वाढ झाल्याची माहिती ट्रॅक्टर मालकांनी दिली.

अल्पभूधारक शेतकऱ्यांची स्थिती अधिकच बिकट झाली आहे. उत्पादन खर्च जास्त आणि उत्पन्न कमी असल्याने त्यांना आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. मजूर उपलब्धतेच्या अडचणींमुळे शेतीचे नियोजन बिघडत असून शेती टिकवणे कठीण बनले आहे. दरम्यान, विविध शेती कामांसाठी ट्रॅक्टरचे दरही वाढले असून नांगरणी, रोटाव्हेटर, पेरणी, सरी काढणे आदी कामांसाठी मोठा खर्च करावा लागत आहे. परिणामी शेतीचा एकूण खर्च वाढत असून शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी अधिकच तीव्र होत आहे.

## उन्हाच्या तीव्रतेमुळे वीजमागणीत वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** राज्यात वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे वीजवापरात लक्षणीय वाढ होत असून, येत्या काही दिवसांत वीजमागणी आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या मुंबईसह राज्यातील प्रतिदिन वीजमागणी ३० हजार मेगावॅटच्या घरात पोहोचली आहे.

राज्याला प्रामुख्याने महानिर्मितीच्या कोराडी, नाशिक आणि चंद्रपूर येथील औष्णिक वीज प्रकल्पांतून सुमारे ७,१७५ मेगावॅट वीजपुरवठा होत आहे. याशिवाय केंद्रीय प्रकल्पांतून ४,७४७ मेगावॅट आणि कोयना तसेच इतर जलविद्युत प्रकल्पांतून २,०१७ मेगावॅट वीज उपलब्ध होत आहे.

अपारंपरिक ऊर्जास्रोतांचाही यात महत्त्वाचा वाटा असून, सौरऊर्जेतून सुमारे २,४५३ मेगावॅट आणि पवनऊर्जेतून २५८ मेगावॅट वीज ग्रीडमध्ये येत आहे. तसेच साखर उद्योगांतील सहवीजनिर्मिती प्रकल्पांतून २४४ मेगावॅट वीज मिळत आहे.

महावितरणकडून पॉवर एक्स्चेंजमधून सुमारे ६२५ मेगावॅट वीज खरेदी केली जात आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आगामी काळात उष्णतेची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे वातानुकूलित यंत्रणा, कूलर आदींचा वापर वाढून वीजमागणी नव्या उच्चांकावर जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## सारांश वृत्त

### कर्नाटकात दहावीचा ऐतिहासिक निकाल

**बंगळूर:** नियमित विद्यार्थ्यांच्या एसएसएलसी (इयत्ता १० वी) परीक्षा-१ चा निकाल गुरुवारी जाहीर झाला असून, उत्तीर्णतेचे प्रमाण 'ऐतिहासिक' ९४.१ टक्के आहे. गेल्या वर्षीच्या तिन्ही परीक्षांच्या ८०.०४ टक्क्यांच्या तुलनेत निकालात १४.०६ टक्क्यांची वाढ झाली आहे. कर्नाटक इयत्ता १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी तीन वार्षिक बोर्ड परीक्षा आयोजित करते आणि ते त्यांच्या गुणपत्रिकेवर दिसणारे सर्वोत्तम गुण निवडू शकतात.

### इमाम ड्रग्जविरोधी युद्धात सहभागी

**श्रीनगर** : जम्मू आणि काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील विविध मशिदींचे इमाम आणि व्यवस्थापन समित्यांनी सरकारच्या 'ड्रग्ज विरोधी युद्धात' सहभाग घेतला असून, अमली पदार्थांच्या गैरवापराविरोधात जनजागृती करण्यासाठी आपल्या धार्मिक व्यासपीठाचा वापर करत आहेत, असे अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले. "अमली पदार्थांच्या धोक्याविरोधात एका महत्त्वपूर्ण सामुदायिक उपक्रमांतर्गत, अनंतनागमधील मशिदींनी अमली पदार्थांचा गैरवापर आणि अवैध लागवड रोखण्यासाठी पोलिसांच्या सुरू असलेल्या प्रयत्नांना पूर्ण पाठिंबा दिला आहे," असे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

### वाहन दरीत कोसळून आठ जण ठार

**नवी टिहरी** : टिहरी जिल्ह्यातील चंबा परिसरात गुरुवारी एक पिकअप वाहन खोल दरीत कोसळल्याने आठ जणांचा मृत्यू झाला आणि दोघे जखमी झाले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. घणसाली जिल्ह्यातील थ्योलधार गावचे रहिवासी असलेले पीडित, हरिद्वारमध्ये एका गावकऱ्याचा अंत्यसंस्कार करून घरी परतत असताना बोलेरो कॅम्परवरील चालकाचे नियंत्रण सुटले, अशी माहिती टिहरीच्या जिल्हाधिकारी नितिका खंडेलवाल यांनी दिली. अपघाताच्या वेळी वाहनात सुमारे १० जण होते. आपत्कालीन आणि बचाव पथकांनी आठ मृतदेह बाहेर काढले असून जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केले आहे.

## केरळच्या मत्स्यव्यवसाय क्षेत्रात मनुष्यबळाचा तुटवडा

# निवडणुकांमुळे स्थलांतरित मजूर गावी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोल्लम** : निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर स्थलांतरित मजूर मोठ्या प्रमाणात आपल्या मूळ राज्यांकडे परतल्याने केरळमधील मत्स्यव्यवसाय क्षेत्रात गंभीर मनुष्यबळाची कमतरता निर्माण झाली आहे. परिणामी, समुद्रात जाण्यासाठी आवश्यक कामगार उपलब्ध नसल्याने अनेक बोटी नांगरून ठेवाव्या लागत आहेत.

या क्षेत्रातील सुमारे ६० टक्के कामगार इतर राज्यांतील असून, त्यांच्या अनुपस्थितीचा थेट परिणाम मासेमारी व्यवसायावर होत आहे. आसाममधील ९ एप्रिलच्या निवडणुका, नागालँड आणि त्रिपुरातील पोटनिवडणुका तसेच तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये होत असलेल्या निवडणुकांसाठी अनेक कामगार आपल्या गावी परतले आहेत.


राज्यातील मत्स्यव्यवसायात पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू येथील कामगारांची संख्या मोठी आहे. मासेमारीव्यतिरिक्त साल काढण्याच्या शेड, जाळी विणण्याचे काम आणि बर्फ कारखान्यांमध्येही स्थलांतरित कामगार मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. मत्स्यव्यवसाय हा प्रामुख्याने स्थलांतरित कामगारांवर अवलंबून असून स्थानिक कामगारांची संख्या मर्यादित आहे. त्यामुळे कामगारांच्या अनुपस्थितीमुळे उद्योगावर ताण वाढला आहे.

"सध्या सुमारे २५ टक्के बोटींवर कामगार उपलब्ध नाहीत. महिन्याच्या अखेरीपर्यंत हा आकडा ५० टक्क्यांपर्यंत वाढू शकतो," अशी माहिती ऑल केरळ बोट ऑपरेटर्स असोसिएशनचे राज्य अध्यक्ष पीटर मथियास यांनी दिली. गेल्या दोन आठवड्यांत मासेमारीवरून परतलेल्या अनेक बोटी कामगारांअभावी पुन्हा समुद्रात जाऊ शकलेल्या नाहीत. राज्यात एप्रिल ते १० जून हा सागरी मासेमारीचा सर्वाधिक सक्रिय हंगाम मानला जातो. या काळात निर्यातक्षम माशांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. "बंगालच्या उपसागरात ट्रॉलिंगवर बंदी असल्याने तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि इतर राज्यांतील व्यापारी मासे खरेदीसाठी केरळमध्ये येत आहेत," असे मथियास यांनी सांगितले.

दरम्यान, कामगारांच्या कमतरतेमुळे व्यवसायावर परिणाम होण्याची भीती बोट मालक व्यक्त करत आहेत. एलपीजी तुटवड्यानंतर नुकतेच सावरू लागलेल्या या क्षेत्रासमोर आता नव्या संकटाचे आव्हान उभे राहिले आहे.

# पेट्रोल दरवाढीच्या बातम्या 'बनावट' : केंद्र सरकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ झाल्याच्या बातम्या 'बनावट' असल्याचे स्पष्ट करत पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने त्या फेटाळून लावल्या आहेत. सध्या इंधनाचे दर अपरिवर्तित असल्याचे मंत्रालयाने पुन्हा स्पष्ट केले.

मंत्रालयाने सोशल मीडियावरील पोस्टद्वारे सांगितले की, पेट्रोल-डिझेल दरवाढीबाबत फिरणाऱ्या बातम्यांना कोणताही अधिकृत आधार नाही. सरकारकडून दरवाढीचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नसल्याचेही नमूद करण्यात आले. या प्रकारच्या बातम्या नागरिकांमध्ये भीती आणि संभ्रम निर्माण करण्याच्या उद्देशाने पसरवल्या जात असून त्या दिशाभूल करणाऱ्या असल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे. नागरिकांनी अशा अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले.

मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, भारतात गेल्या चार वर्षांत पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ झालेली नाही. आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये चढ-उतार होत असतानाही सरकार आणि सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांनी दर स्थिर ठेवण्यासाठी प्रयत्न केले आहेत. सध्या जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढत असल्या तरी देशांतर्गत दरांवर त्याचा परिणाम होऊ नये, यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. तेल विपणन कंपन्यांनीही किमतीतील चढ-उतार सहन करत ग्राहकांवरील भार कमी ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

दरवाढीच्या अफवांमुळे निर्माण झालेल्या संभ्रमाच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयाने पुन्हा एकदा स्पष्ट केले की, सध्या पेट्रोल आणि डिझेलचे दर स्थिर असून कोणताही बदल झालेला नाही. नागरिकांनी अचूक माहितीसाठी अधिकृत स्रोतांवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# संयुक्त राष्ट्रांमध्ये बहुपक्षीयतेची पाठराखण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : जागतिक पातळीवरील वाढत्या तणाव आणि बहुपक्षीय व्यवस्थांवरील प्रश्नचिन्हांच्या पार्श्वभूमीवर भारताने संयुक्त राष्ट्रांसह आंतरराष्ट्रीय मंचांवर बहुपक्षीयतेप्रती आपली ठाम बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली आहे.

भारताने स्पष्ट केले की, जागतिक आव्हानांचा सामना करण्यासाठी सहकार्य, संवाद आणि नियमाधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था अत्यावश्यक आहे. हवामान बदल, दहशतवाद, आर्थिक अस्थिरता आणि आरोग्य संकटांसारख्या मुद्द्यांवर एकत्रित प्रयत्नांची गरज असल्याचे भारताने नमूद केले. संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठावर भारताने विकसनशील देशांच्या आवाजाला अधिक महत्त्व देण्याची गरजही अधोरेखित केली. जागतिक निर्णयप्रक्रियेत समावेशकता वाढवणे आणि संस्थात्मक सुधारणा करणे ही काळाची गरज असल्याचे भारताने स्पष्ट केले. जागतिक वास्तवाशी सुसंगत प्रतिनिधित्वासाठी सुधारणा आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. भारताने "वसुधैव कुटुंबकम्" या तत्त्वाचा उल्लेख करत जागतिक सहकार्य, शांतता आणि शाश्वत विकासासाठी सर्व देशांनी एकत्र येण्याचे आवाहन केले.

# पीएम मोदींचा टीएमसीवर घणाघात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी मतदान सुरू असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालमध्ये प्रचारसभा घेत सत्ताधारी तृणमूल काँग्रेसवर घुसखोरी आणि प्रशासनाच्या मुद्द्यावरून तीव्र टीका केली. तसेच नागरिकत्व सुधारणा कायद्यांतर्गत नागरिकत्व देण्याची प्रक्रिया अधिक गतीमान करण्याचे आश्वासन दिले.

कृष्णनगर येथील सभेत बोलताना मोदींनी मोठ्या प्रमाणात झालेल्या मतदानाचे स्वागत करत ते बदलासाठी मिळालेल्या जनादेशाचे संकेत असल्याचे सांगितले. 'झालमुरी'चा उल्लेख करत त्यांनी टीएमसीवर टीका करताना राजकीय वातावरण रंगवले.

मोदींनी आरोप केला की, टीएमसी सरकार घुसखोरांना पाठिंबा देत असून राज्यात 'जंगलराज' निर्माण झाले आहे. "सबका साथ, सबका विकास हा आमचा मंत्र आहे; मात्र टीएमसी 'घुसखोरांची साथ, घुसखोरांचा विकास' या धोरणावर काम करत आहे," असा आरोप त्यांनी केला. मतदान प्रक्रियेबाबत बोलताना मोदींनी निवडणूक आयोगाचे कौतुक केले. गेल्या अनेक वर्षांच्या तुलनेत निवडणूक हिंसाचार कमी झाल्याचा दावा करत त्यांनी शांततेत मतदान पार पडल्याचे नमूद केले. वाढत्या मतदान टक्केवारीचा उल्लेख करत त्यांनी भाजपच्या विजयाची शक्यता व्यक्त केली. नागरिकत्व सुधारणा कायद्याबाबत भूमिका स्पष्ट करत मोदी म्हणाले की, भाजप सत्तेत आल्यास मतुआ, नामाशूद्र आणि इतर निर्वासित समुदायांना नागरिकत्व देण्याची प्रक्रिया वेगाने राबवली जाईल. "प्रत्येक पात्र नागरिकाला सर्व हक्क मिळतील," असे आश्वासन त्यांनी दिले. मागील निवडणुकीत लक्षणीय यश मिळवलेल्या भाजपकडून यावेळी सत्तांतराचा दावा केला जात आहे, तर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली टीएमसी पुन्हा सत्तेत येण्याचा प्रयत्न करत आहे.

# केजरीवालांच्या सुनावणीचे व्हिडिओ हटवा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : दिल्ली उच्च न्यायालयाने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या न्यायालयीन कामकाजाचे अनधिकृत व्हिडिओ सोशल मीडियावरून तातडीने हटवण्याचे आदेश देत कठोर भूमिका घेतली आहे.

मद्य धोरण प्रकरणात अटकेत असताना केजरीवाल यांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी त्यांनी न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांच्यासमोर स्वतः बाजू मांडली होती. या सुनावणीदरम्यानचे काही व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले.


नियमानुसार न्यायालयीन कामकाजाचे अनधिकृत चित्रीकरण किंवा प्रसारण करण्यास मनाई असते. तरीही हे व्हिडिओ विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर प्रसारित झाल्याने न्यायालयाने याची गंभीर दखल घेतली.

या प्रकरणी न्यायालयाने केवळ व्हिडिओ हटवण्याचे आदेश दिले नाहीत, तर नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल संबंधितांना नोटिसाही बजावल्या आहेत. यामध्ये अरविंद केजरीवाल, ज्येष्ठ पत्रकार रवीश कुमार, तसेच व्हिडिओ अपलोड किंवा शेअर करणारे इतर सोशल मीडिया युजर्स यांचा समावेश आहे. तसेच एक्स (एक्स), इंस्टाग्राम आणि यूट्यूब या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सनाही संबंधित व्हिडिओ तातडीने हटवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांनी स्पष्ट केले की, न्यायालयीन शिष्टाचारानुसार कोणत्याही कामकाजाचे रेकॉर्डिंग करून ते परवानगीशिवाय सार्वजनिक करणे हा गंभीर प्रकार आहे. न्यायालयाने केंद्र सरकार आणि संबंधित यंत्रणांना अशा प्रकारचे व्हिडिओ इंटरनेटवर उपलब्ध राहणार नाहीत याची खात्री करण्याचे निर्देश दिले आहेत.

## निवडणूक आयोगावर कपिल सिबल यांचे टीकास्त्र

# तर मग निवडणूक घेताय कशाला?



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : माजी केंद्रीय कायदा मंत्री आणि राज्यसभा खासदार कपिल सिबल यांनी निवडणूक आयोगावर जोरदार टीका करत पश्चिम बंगालमध्ये 'मतदानाचा हक्क काढून घेण्याचा प्रयोग' सुरू असल्याचा आरोप केला. या पार्श्वभूमीवर "मग निवडणूक कशाला घ्यायची?" असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वरील पोस्टमध्ये सिबल यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावरही निशाणा साधला. "मतदानाचा हक्क काढून घेण्याचा प्रयोग सुरू आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांना पद्मभूषण द्यायला हवा," असा उपरोधिक उल्लेख त्यांनी केला. यापूर्वीही सिबल यांनी आयोगावर गंभीर आरोप करत पश्चिम बंगाल निवडणुकीत विशिष्ट पक्षाला लाभ होईल, अशा प्रकारे काम होत असल्याचा दावा केला होता. त्यांनी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर मोठ्या प्रमाणात सुरक्षा दल तैनात करण्याच्या निर्णयावरूनही टीका केली. मतदार याद्यांबाबत आक्षेप घेताना सिबल म्हणाले की, "काही ठिकाणी एआयच्या आधारे 'तार्किक विसंगती' दाखवत मतदारांची नावे वगळली जात आहेत. वडील आणि मतदार यांच्या वयातील अंतर कमी किंवा जास्त असल्याचे कारण देऊन नाव वगळले जात आहे, जे योग्य नाही." अशा पद्धतीचा वापर इतर राज्यांत झाला नसल्याचा दावाही त्यांनी केला. या संपूर्ण प्रक्रियेमुळे मतदारांना त्यांच्या मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप करत सिबल यांनी निवडणूक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यातील मतदान सुरू असून २९४ पैकी १५२ मतदारसंघांचा यात समावेश आहे. दुसऱ्या टप्प्यातील मतदान २९ एप्रिल रोजी होणार असून निकाल ४ मे रोजी जाहीर केला जाणार आहे.

# 'कोणताही हिंदू कोणत्याही मंदिरात जाऊ शकतो'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : केरळमधील शबरीमला मंदिर येथे महिलांच्या प्रवेशासंबंधी आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या व्याप्तीशी निगडित ऐतिहासिक खटल्याची सुनावणी सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर आठव्या दिवशीही सुरू राहिली. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी "एक हिंदू शेवटी हिंदूच असतो आणि तो कोणत्याही मंदिरात जाऊ शकतो" असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील या घटनापीठात एकूण नऊ न्यायमूर्तींचा समावेश असून, धार्मिक पंथांना त्यांच्या विशिष्ट प्रथांच्या आधारे इतरांना मंदिरात प्रवेश नाकारण्याचा अधिकार आहे का, यावर विचार सुरू आहे.

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती नागरत्ना यांनी हिंदू समाजाने एकजूट राहण्याची गरज अधोरेखित करत मंदिरांनी पंथाच्या आधारावर भेदभाव करू नये, असे मत व्यक्त केले. शैव, वैष्णव किंवा इतर उपासना पद्धती वेगळ्या असल्या तरी त्या कोणत्याही हिंदूला मंदिरात प्रवेश करण्यास अडथळा ठरू नयेत, असे त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणात घटनात्मक तरतुदींचे व्यापक परीक्षण सुरू असून, अनुच्छेद २५ आणि २६ अंतर्गत धार्मिक स्वातंत्र्य, अनुच्छेद १४ अंतर्गत समानता, तसेच 'घटनात्मक नैतिकता' या संकल्पनांचा सखोल विचार केला जात आहे. धार्मिक प्रथांवर न्यायालयीन पुनर्विलोकनाची मर्यादा आणि जनहित याचिकांची ग्राह्यता हेही महत्त्वाचे मुद्दे आहेत.

सुनावणीदरम्यान 'व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटी'च्या संदर्भावरूनही चर्चा रंगली. वैयक्तिक मतांना न्यायालयीन प्रक्रियेत मर्यादा असतात, असे मत न्यायालयाने व्यक्त केले. सामाजिक सुधारणांमध्ये राज्याच्या भूमिकेबाबत बोलताना न्यायालयाने स्पष्ट केले की, राज्य हे जनतेच्या इच्छेचे प्रतिनिधित्व करते. त्यामुळे सामाजिक सुधारणा करण्यासाठी कायदे करताना राज्याला अधिकार आहे आणि काही प्रसंगी ते धार्मिक पंथांच्या हक्कांवरही प्राधान्याने लागू होऊ शकतात. या प्रकरणाचा निकाल देशातील धार्मिक स्वातंत्र्य, समानता आणि वैयक्तिक हक्क यांच्यातील संतुलन निश्चित करणारा ठरू शकतो.

## मल्लिकार्जुन खर्गे यांनी माफी मागावी

**श्रीनगर** : भाजप नेते राजवर्धन सिंह राठोड यांनी गुरुवारी सांगितले की, एआयसीसी अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी नरेंद्र मोदी यांच्या विरोधात केलेली दहशतवादी टिप्पणी ही पंतप्रधानांना निवडून दिलेल्या कोट्यवधी भारतीयांवरील हल्ला आहे. येथे एका पत्रकार परिषदेला संबोधित करताना, राजस्थान सरकारचे युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्री, राठोड म्हणाले की, काँग्रेस अध्यक्षांनी पंतप्रधान मोदींविरुद्ध "शाब्दिक हिंसाचार" केला असून त्यांनी माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली.

# अमित जोगी यांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री अजित जोगी यांचे पुत्र अमित जोगी यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते राम अवतार जग्गी यांच्या २००३ मधील हत्या प्रकरणात सुनावण्यात आलेल्या जन्मठेपेच्या शिक्षेला न्यायालयाने स्थगिती दिली आहे.

न्यायमूर्ती विक्रम नाथ यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने हा आदेश दिला. या खंडपीठात न्यायमूर्ती संदीप मेहता आणि विजय बिश्नोई यांचाही समावेश होता. "अपीलकर्त्याची शिक्षा आणि जन्मठेपेची शिक्षा स्थगित करण्यात येत आहे," असे न्यायालयाने स्पष्ट केले. छत्तीसगड उच्च न्यायालयाने यापूर्वी २००७ मध्ये सत्र न्यायालयाने दिलेल्या निर्दोष मुक्ततेचा निर्णय रद्द करत अमित जोगी यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या निर्णयाविरोधात जोगी यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सुनावणीदरम्यान न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केले. न्यायमूर्ती मेहता यांनी, "सुनावणी न घेता दिलेला हा कसला निकाल?" अशी टिप्पणी करत दोषसिद्धीच्या प्रक्रियेवर शंका व्यक्त केली. या प्रकरणात २००७ मध्ये सत्र न्यायालयाने २८ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती, मात्र पुराव्याअभावी अमित जोगी यांची निर्दोष मुक्तता केली होती. त्यानंतर केंद्रीय अन्वेषण विभागाच्या अपिलावर उच्च न्यायालयाने त्यांची निर्दोष मुक्तता रद्द केली होती.

## स्वदेशी नेटवर्क-केंद्रित फायर कंट्रोल सिस्टीमकडे वाटचाल

# भारतीय लष्कराची नेटवर्क प्रणालीची योजना

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : भारतीय लष्कराने तोफखाना आणि क्षेपणास्त्र युनिट्सच्या कार्यपद्धतीत मोठा बदल घडवून आणण्यासाठी स्वदेशी, नेटवर्क-केंद्रित फायर कंट्रोल सिस्टीम विकसित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रणालीमुळे रणांगणावरील समन्वय अधिक वेगवान, अचूक आणि एकात्मिक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

लष्कराच्या माहिती प्रणाली महासंचालनालयाने 'लँड व्हेक्टर्स कंट्रोल अँड कोऑर्डिनेशन सिस्टीम' (एलव्हीसीसीएस) विकसित करण्यासाठी माहिती मागवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रणालीद्वारे तोफा, हॉवित्झर, रॉकेट, क्षेपणास्त्रे तसेच लोइटरिंग म्युनिशन यांसारख्या सर्व भू-आधारित हल्ला साधनांना एकाच डिजिटल नेटवर्कमध्ये जोडण्याचा उद्देश आहे. या प्रणालीमुळे लक्ष्य शोधणे, नियोजन, अंमलबजावणी आणि हल्ल्यानंतरचे मूल्यांकन या सर्व प्रक्रिया स्वयंचलित पद्धतीने आणि जवळपास रिअल-टाइममध्ये पार पाडता येणार आहेत. सध्या या प्रक्रियेत अनेक टप्प्यांवर मानवी हस्तक्षेप असल्याने निर्णय घेण्यास विलंब होतो आणि उपलब्ध संसाधनांचा पूर्ण क्षमतेने वापर होत नाही.

एलव्हीसीसीएसमुळे 'सेन्सर-टू-शूटर' चक्र लक्षणीयरीत्या कमी होणार असून, रणांगणावर त्वरित आणि अचूक मारा करणे शक्य होईल. आधुनिक युद्धांमध्ये वेग आणि डेटा एकत्रीकरण महत्त्वाचे ठरत असल्याने अशा प्रणालींचे महत्त्व वाढले आहे. ही प्रणाली सी४आयर२ (कमांड, कंट्रोल, कम्युनिकेशन, कॉम्प्युटर्स, इंटेलिजन्स आणि इंटरऑपरेबिलिटी) तत्त्वावर आधारित असेल आणि विद्यमान निगराणी व निर्णय-सहाय्य प्रणालींसोबत एकात्मिकपणे कार्य करेल. जीआयएस तंत्रज्ञानाच्या मदतीने भूभाग, लक्ष्य आणि तैनाती यांची माहिती रिअल-टाइममध्ये नकाशावर पाहता येणार आहे. तांत्रिकदृष्ट्या ही प्रणाली मॉड्यूलर आणि हार्डवेअर-निरपेक्ष ठेवण्यात येणार असून भविष्यातील अपग्रेड सहज शक्य होतील. सॅटेलाइट, रेडिओ आणि इतर माध्यमांद्वारे सुरक्षित, एन्क्रिप्टेड कम्युनिकेशन यामध्ये समाविष्ट असेल. ही प्रणाली रेजिमेंट स्तरावर चाचणीसाठी वापरली जाईल, ज्यामध्ये १५५ मिमी बोफोर्स तोफा आणि स्मर्च रॉकेट सिस्टीमचे एकत्रीकरण केले जाणार आहे. त्यानंतर ती टप्प्याटप्प्याने विस्तारित केली जाईल. 'मेक इन इंडिया' अंतर्गत विकसित होणाऱ्या या प्रकल्पात बौद्धिक संपदा हक्क आणि सोर्स कोड लष्कराकडेच राहणार असून, ही प्रणाली पुढील १० वर्षांत सातत्याने विकसित होत राहील. या उपक्रमामुळे भारतीय लष्कराच्या आक्रमक क्षमतेत आणि रणनितीतील वेगात महत्त्वपूर्ण वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.